नि.दि. दावा १२४/२०२२
संदीप वि. अनिल
CNR.NO.MHWS080017062022

**नियमीत दिवाणी दावा क्र. १२४/२०२२ मधील निशाणी क्र. २२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीतील परिस्थिती **जैसे थे** ठेवण्यासाठी दिलेला आहे. अर्ज व त्यावरील प्रतीवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदर प्रकरण वादीने प्रतीवादी विरूद्ध वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करू नये व प्रतीवादी क्र. ०२ ने वाद मिळकतीचे कोणत्याही स्वरूपात हस्तांतरण करू नये म्हणुन कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये प्रतीवादी क्र. ०२ हा त्याच्या वकीलामार्फेत हजर झाला असुन त्याचा लेखी जबाब दाखल केला नाही. प्रतीवादी क्र. ०२ हा वाद मिळकत हस्तांतरण करण्याच्या तयारी मध्ये आहे. प्रतीवादी क्र. ०२ च्या गैरकृत्यास आळा बसावा म्हणुन पुढील आदेशापर्यत **जैसे थे** आदेश पारीत होण्याची विनंती केली.
प्रतीवादी क्र. ०१ याच्या विधीज्ञाने सदर अर्जावरती म्हणणे दिले सदर अर्जास त्यानी विरोध दर्शविला नाही.व प्रतीवादी क्र. ०२ याने त्याचे म्हणणे दिले नाही.

३ प्रतीवादी क्र. ०२ यानी आज रोजी हजर होवुन त्याची कैफियत दाखल करण्यास मुदत मागतले आहे.तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज प्रलंबीत असुन गुणदोषावर सदरचा अर्ज निर्णीत होणे आवश्यक आहे. प्रतीवादीचे तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या सदरचा अर्ज निकाली काढणे संयुक्तीक होणार आहे. मात्र दावा मिळकतीचे काळात तबील झाल्यास दाव्याचा तात्पुरत्या मनाई हुकुमच्या अर्जाचा उद्देश असफल होण्याची शक्यता नाकारला येणार नाही. सबब खालील आदेश.

आदेश

१. निशाणी क्र. २२ वरील अर्ज खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी व प्रतीवादी याने दावा मिळकतीसंदर्भात आहे ती **परिस्थिती/जैसे थे** पुढील तारखेपर्यत ठेवावी.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

स्वा/—
(श्रीमती पी.एम. कांबळे)
२रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रिसोड

दि. १३.०२.२०२३

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr.clerk | :- | V.V.Gaykwad |
| Court | :- | J.M.F.C.& Jt. Civil Court,J.D.,Risod. |
| Date | :- | 13/02/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 13/02/2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 13/02/2023 |